**वाचले :-**
१ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१)
२ आदेश क्रमांक प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दिनांक २९/०८/२०१३
३ आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/५४६/२०१६ दिनांक ०७/१०/२०१६
४ परिपत्रक क्रमांक प्रशा/२/कावि/७०६/२०१७ दिनांक २६/०९/२०१७
५ श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांचा दि.३०/०१/२०२५ रोजीचा स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूरी बाबतचा विनंती अर्ज.
६ मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वायसीएमएच यांचे पत्र क्र. वायसीएमएच/०५/कावि/२४४/२०२५ दि.१३/०२/२०२५
७ सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०५/०३/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/५६/२०२५
दिनांक ०५/०३/२०२५

**विषय :- श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांचे स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.**
**(संगणक क्रमांक ४९४०)**

आदेश,

श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'स्टाफनर्स' या पदावर कार्यरत असून दि.२७/०६/१९९६ रोजी त्या महापालिका सेवेमध्ये 'स्टाफनर्स' पदावर रुजू झाल्या आहेत. त्यांचे सेवानोंद पुस्तकातील नोंदीनुसार त्यांची जन्मतारीख २०/०२/१९७० अशी आहे. श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांनी उपरोक्त वाचले क्र.५ चे अर्जान्वये वैयक्तिक कारणास्तव मनपा सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच विभागप्रमुखांनी उपरोक्त वाचले क्र.६ अन्वये श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांची स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करणेकामी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार शासकीय कर्मचा-यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झाले नंतर नियुक्ती प्राधिका-यास ३ महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवेतून केव्हाही सेवानिवृत्त होता येईल अशी तरतूद आहे. श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबत केलेली विनंती विचारात घेता उपरोक्त वाचले क्र. १ ते ४ मधील तरतुदीनुसार त्यांना दि.३०/०४/२०२५ रोजी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी उपरोक्त वाचले क्र.०६ चे पत्रान्वये श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी अग्रिम, संगणक अग्रिम, वाहन अग्रिम,कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नाही याप्रमाणे कळविले आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग उपरोक्त वाचले क्र.२ चे आदेश निर्गमित करणेबाबत निश्चित केलेले धोरणानुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम ६६(१) मधील तरतूद विचारात घेता, श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांना दि.३०/०४/२०२५ रोजी मध्यान्होत्तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतून स्वेच्छासेवानिवृत्त करणेस मान्यता देत आहे.

श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांना निवृत्तीवेतन, सेवाउपदान इ.रकमा अदा करणेकामी विभागाने आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन प्रकरण लेखा विभागाकडे सादर करावे. लेखा विभागाने श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांच्याकडून येणे बाकी असलेल्या सर्व रकमांबाबत खातरजमा करावी व अशा येणे बाकी असलेल्या सर्व रकमा त्यांना देय असलेल्या रकमेतून प्रथम वसूल करुन घेवून नंतरच अंतिमत: देय असलेली रक्कम अदा करण्याची दक्षता सर्व संबंधित विभागप्रमुखांनी घ्यावी. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स' यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति - श्रीम.आढाव मिनाक्षी सोपान, 'स्टाफनर्स'
प्रत - लेखा विभाग
२/-.१.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग ४.कामगार कल्याण विभाग ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग ६.सामान्य प्रशासन टेबल क्र. ७,१०,१२,२२, संगणक कक्ष ७.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ ८.पिं.चिं.मनपा कर्मचारी पतसंस्था ९. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय १०.सर्व संबंधित विभाग